## सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ८.

## मी शपथेवर कथन करते की,

**नाव —** शकुंतला महादेव तारडे.

**वय** - ३४ वर्ष, **हुद्दा** - महिला पोलिस हवालदार ब. नं.२१५३,

**नेमणूक.-** राधानगरी पोलिस स्टेशन, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर.

**सरतपास– श्रीमती. एस. ए. म्हामूलकर, सरकारी वकील.**

**१.** मी सन २०१९ ते २०२४ या कालावधीत आजरा पोलिस ठाण्यात पोलिस हवालदार या पदावरती कार्यरत होते. दि.०६.०६.२०२२ रोजी सदर गुन्हा तपासकामी माझ्याकडे देण्यात आला होता. आता मला तो आदेश दाखवला, त्याला **नि. क्र. पी.७३** देण्यात येतो. मला तपासकामी आदेशा सोबत एफ.आय. आर. ची प्रत, फिर्यादीचा जबाब आणि भाग ब मिळाला होता. त्यानंतर मी दि.०८.०६.२०२२ रोजी फिर्यादीने दाखवलेल्या घटनास्थळाचा दोन पंचांसमक्ष पंचनामा केला होता. आता मला तो पंचनामा दाखवला, त्यावरती माझी व पंचांची स्वाक्षरी असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला नि. क्र.२९ देण्यात आलेला आहे.

**२**. त्यानंतर मी पुढे तपासकामी फिर्यादी कडून तिच्या लग्नाचे फोटो घेतले होते. मी दि.०९.०६.२०२२ रोजी फिर्यादी कडून साक्षीदारांची नावे घेऊन त्यांचे जबाब नोंदवले होते. मी आरोपींना न्यायालयात हजर राहण्या बाबत फौ. प्र. सं. ४१ प्रमाणे नोटीसा दिल्या होत्या. आता मला त्या दोन नोटीसा दाखवल्या, त्यांना अनुक्रमे **नि. क्र. पी.७४ व ७५** देण्यात येतात. त्यानंतर मी दि.१०.०६.२०२२ रोजी फिर्यादीच्या सांगण्या प्रमाणे खेडगे गावातील गोपाळ ढोकरे याचा जबाब नोंदवला होता.

**३**. त्यानंतर मी दि.१६.०६.२०२२ रोजी फिर्यादीच्या लग्नाचे विवाहप्रमाणपत्र मिळवले होते. त्यानंतर मी आरोपींच्या राहत्या घराचा उतारा तपासकामी मिळवला होता. मी तपासकामी फिर्यादीच्या लहान मुलाचा जबाब नोंदवला होता. मला तपासामध्ये आरोपींनी फिर्यादीच्या चारित्र्यावरती संशय घेऊन बदनामी करुन तिच्याकडे पैशांची मागणी करुन तिला शारिरीक व मानसिक त्रास देऊन तिचा छळ केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे मी

दोषारोपपत्र दाखल केले आहे. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकते. आज आरोपी क्र.२ न्यायालयात हजर असून इतर आरोपी गैरहजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – श्री. जी. जे. पाटील वकील.</u>**

**४.** आरोपीच्या विधिज्ञांनी नि. क्र.७६ प्रमाणे दिलेल्या मुदतीच्या अर्जावरुन उलट तपास पुढील तारखे पर्यंत तहकूब.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १०.०७.२०२५. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

**प्रमाणपत्र**

सदर साक्ष नोंदवण्यापूर्वी व्ही.सी. / दृकश्राव्य माध्यमाची तपासणी करण्यात आलेली असून चलचित्र व आवाज स्पष्टरित्या येत असल्याची साक्षीदार व सरकारी आणि आरोपीच्या वकिलांनी पृष्ठता केल्यामुळे पुरावा नोंदविण्यात आलेला आहे.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १०.०७.२०२५. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.